


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६३४. वा | गुरूवार | दि. २१ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# लोकसभेत तीन महत्त्वाच्या फौजदारी विधेयकांना मान्यता, अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

निलंबित खासदारांसह बहुतांश विरोधी पक्षीय खासदारांच्या अनुपस्थितीत लोकसभेत बुधवारी तीन नवीन फौजदारी संहिता विधेयके मंजूर करण्यात आली. याबरोबरच देशद्रोहाचा ब्रिटिशकालीन कायदा रद्द करण्यात आला. नव्या कायद्यानुसार सशस्त्र, हिंसक आंदोलन करणाऱ्यांवर देशद्रोहाच्या कायद्याखाली गुन्हा नोंदवला जाणार आहे. अल्पवयीन मुलीवर बलात्कार, दहशतवादी कारवाया आणि झुंडबळीसारख्या गुन्ह्यांसाठीही फाशीच्या शिक्षेची तरतूद नव्या कायद्यांत असणार आहे. फौजदारी कायद्यांशी संबंधित भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ व भारतीय साक्षीदार किंवा साक्ष विधेयक २०२३ ही तीन विधेयके लोकसभेत मंजूर झाली. या विधेयकांचे महत्त्व शहा यांनी स्पष्ट केले. गुलामगिरीचे दाखले असलेले तीन फौजदारी कायदे रद्द करून ही नवीन विधेयके करण्याचा उद्देश कायदा आणि सुव्यवस्था मुळापासून सुधारणे हा आहे. दीडशे वर्षांपूर्वीचे हे कायदे रद्द करून प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्यघटनेच्या भावार्थानुसार गुन्हेगारी संहितेचे कायदे बनवले जाणार आहेत. ही तीन विधेयके आपल्या राज्यघटनेचा आत्मा प्रतिबिंबित करतात. परंतु इटलीची मानसिकता असलेल्या लोकांना ते कधीच समजणार नाही, असा टोला शहा यांनी लगावला. गुलामगिरीच्या काळातील गुन्हेगारी कायद्यांची जागा घेणारी ही तीन विधेयके गुन्हेगारी न्यायव्यवस्थेत मानवकेंद्रित दृष्टिकोन ठेवून बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवतात. कोणालाही थेट शिक्षेऐवजी न्यायावर लक्ष केंद्रित करतात. हे तिन्ही कायदे न्याय, पारदर्शकता आणि निष्पक्षतेवर आधारित आहेत, असे शहा म्हणाले.वंश, जात आणि समुदायाच्या आधारावर होणाऱ्या झुंडबळीच्या विरोधात विधेयकात नवीन तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावित कायद्यात अशा आरोपींसाठी जन्मठेपेपासून फाशीच्या शिक्षेपर्यंतच्या तरतुदी आहेत. ब्रिटिशकालीन देशद्रोहाचे कायदे सरकारने रद्द केले आहेत. नव्या प्रस्तावित कायद्यात फाशीच्या शिक्षेचे जन्मठेपेत रूपांतर करण्याची तरतूद आहे. तसेच आता जन्मठेपेची शिक्षाही सात वर्षांच्या तुरुंगवासात बदलली जाऊ शकते. लोकसभेप्रमाणेच राज्यसभेतही विरोधकांची संख्या नगण्या झाल्याने आज, गुरुवारी राज्यसभेत ही तीनही विधेयके सहजपणे मंजूर होतील. त्यानंतर रात्रीपर्यंत संसदेचे हिवाळी अधिवेशन गुंडाळण्यात येईल,



अशी चर्चा आहे. नियोजनानुसार शुक्रवारपर्यंत अधिवेशन चालणार आहे.भारतीय न्यायिक संहितेत दहशतवादाची सविस्तर व्याख्या करण्यात आली आहे आणि त्याला दंडनीय गुन्हा ठरवण्यात आले आहे. यातून पळवाटा काढणे आता शक्य होणार नाही असा सरकारचा दावा आहे.नव्या कायद्यांमध्ये सामूहिक बलात्कार प्रकरणात २० वर्षांचा तुरुंगवास किंवा जन्मठेपेची तरतूद आहे. खोटे आश्वासन देऊन किंवा ओळख लपवून शारीरिक संबंध ठेवणेही गुन्हा ठरणार आहे. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्यांना जन्मठेप किंवा फाशीची तरतूद आहे. लैंगिक हिंसाचाराच्या प्रकरणात केवळ महिला न्यायदंडाधिकारीच जबाब नोंदवतील. पीडितेचा जबाब तिच्या निवासस्थानी महिला पोलिस अधिकाऱ्यासमोर नोंदवला जाईल. निवेदन नोंदवताना पीडितेचे आई/वडील किंवा पालक उपस्थित राहू शकतात, अशीही तरतूद यात आहे.




# योजनांचा लाभ मिळविण्यासाठी शेतक-यांनी आधार, ईकेवायसी करून घ्या - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १६ वी हप्ता जानेवारी, २०२४ च्या शेवटी वितरीत करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने केंद्र शासन प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या संपृक्तता साध्यतेसाठी ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत गावपातळीवर ४५ दिवसांची विशेष मोहीम राबवित आहे. जिल्ह्यातील १० हजार ६१९ शेतकऱ्यांची ई-केवायसी आणि १३ हजार ७९७ शेतकऱ्यांचे आधार लिंकींग (सीडिंग) प्रलंबित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या मोहिमेतर्गत प्रलंबित ई केवायसी व आधार सीडिंग व बँक खात्याला करणे, किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकेत खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करण्याचे काम तत्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, ते केले नसल्यास शेतकरी



लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक, गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सरकार व पत्रकारांमध्ये आ. संजय गायकवाड यांची यशस्वी मध्यस्थी...

## पत्रकारांच्या अभ्यासगटात प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांचा समावेश

**जनसंचलन/बुलढाणा**

पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणार्थ झटणाऱ्या, पत्रकारांचा बुलंद आवाज असलेल्या व्हॉईस ऑफ मीडियाने न्याय्य हक्काकरिता शासन दरबारी आपली लढाई सुरू केली आहे. पत्रकारांचे हित जोपासणारे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवस लाक्षणिक उपोषण करण्यात आले. शासन व पत्रकारांत यशस्वी चर्चा घडवून आणण्यासाठी बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी पुढाकार घेतला. आपला शब्द पाळत गायकवाड यांनी ना. शंभूराजे देसाई यांच्यासोबत पत्रकारांच्या शिष्टमंडळाची भेट घालून दिली. आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने अभ्यासगट नेमला असून, त्यात आता प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांची निवड करण्यात येत असल्याची घोषणा ना. देसाई यांनी यावेळी केली. राज्य सरकारने नेमलेल्या अभ्यासगटाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पत्रकारांचे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करू, अशी ग्वाही महाराष्ट्राचे गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन विभागाचे राज्यमंत्री ना. शंभूराजे देसाई यांनी पत्रकारांना दिली. आ. संजय गायकवाड यांच्या मध्यस्थीतून शासनाकडून सकारात्मक भूमिका घेण्यात येत असल्याने लवकरच महामंडळाचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पत्रकारांनी नागपुरात केलेले आंदोलन यशस्वी झाले असून, ना. देसाई यांनी शासनाच्या वतीने दिलेला शब्द पाहता राज्यभरातील पत्रकारांना दिलासा मिळाला आहे.

पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया या संघटनेच्या वतीने नागपुरात तीन दिवस लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला आ. संजय गायकवाड यांनी भेट दिली. सरकार आणि पत्रकारांमध्ये बैठक घडवून आणण्याचा शब्द दिला. आपले वचन पाळत आ. गायकवाड यांनी मंगळवारी हिवाळी अधिवेशनादरम्यान ना. शंभुराजे देसाई यांच्या दालनात पत्रकारांच्या शिष्टमंडळाची बैठक घडवून आणली. याप्रसंगी राष्ट्रीय कार्याध्यक्ष दिव्या भोसले, विदर्भाध्यक्ष मंगेश खाटिक, राज्य उपाध्यक्ष राजेश सोनटक्के, नागपूर अध्यक्ष आनंद आंबेकर, वर्धा जिल्हाध्यक्ष किशोर कारंजेकर, चंद्रपूर शहराध्यक्ष जितेंद्र चोरडिया यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते. संतोष शिंगणे यांनी अथक परिश्रम घेऊन पत्रकारांची भेट घडवून आणली. यावेळी पत्रकार कल्याणकारी महामंडळ, पत्रकारांसाठी गृहनिर्माण प्रकल्प, पत्रकारांच्या मुलांना शिक्षणात आरक्षण, प्रत्येक जिल्हास्थानी पत्रकार भवन, पत्रकारांना विमा सुरक्षा, पत्रकार पेन्शन, अधीस्वीकृती योजनेत सुलभता यासह विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी मंत्री शंभूराजे देसाई यांनी पत्रकारांच्या मागण्या रास्त असून त्याबद्दल सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले. यावेळी पत्रकार कल्याणकारी महामंडळ, पत्रकारांसाठी गृहनिर्माण प्रकल्प, पत्रकारांच्या मुलांना शिक्षणात आरक्षण, प्रत्येक जिल्हास्थानी पत्रकार भवन, पत्रकारांना विमा सुरक्षा, पत्रकार पेन्शन, अधीस्वीकृती योजनेत सुलभता यासह विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी मंत्री शंभूराजे देसाई यांनी पत्रकारांच्या मागण्या रास्त असून त्याबद्दल सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले.



पत्रकारांचे कल्याण व्हावे, ही मनस्वी इच्छा : आ. गायकवाड शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या धोरणानुसार आ. संजय गायकवाड हे आपले कार्य करत आहेत. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असून, पत्रकारांना किती अडचणींना सामोरे जावे लागते, याची जाणिव आपल्याला आहे, हे आ. गायकवाड यांनी पत्रकारांच्या विविध कार्यक्रमांमध्ये वेळोवेळी बोलून दाखवले. आपल्या बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकारांसाठीच नव्हेतर, राज्यभरातील पत्रकारांच्या कल्याणाचा आपल्यालाही एक छोटासा घटक बनता येईल, या हेतूने आ. गायकवाड यांनी पत्रकार आणि शासनामधील भेटीवर विशेष भर दिला. पत्रकारांचे कल्याण व्हावे, ही मन:पूर्वक इच्छा असल्यानेच या भेटीसाठी पुढाकार घेतल्याचे आ. गायकवाड यावेळी म्हणाले.

---

# नागपूर विधानसभेवर भूमीमुक्ती मोर्चाची धडक; ना.गिरीश महाजन यांची मुख्यमंत्री सोबत बैठकीची ग्वाही...




**जनसंचलन/बुलढाणा**

भूमीमुक्ती व बहुजन मुक्ती मोर्चा तर्फे नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर भूमिहक्क व कर्जमुक्ती सत्याग्रह मोर्चा काढण्यात आला. यावेळी ना. गिरीश महाजन यांनी मोर्चाचे निवेदन स्वीकारून मांगण्यासंदर्भात मुख्यमंत्र्या समवेत बैठक लावण्याची ग्वाही दिली.

संस्थापक अध्यक्ष भाई प्रदीप अंभोरे यांच्या नेतृत्वाखाली यशवंत मैदान येथून मोर्च्या ला सुरुवात झाली. मोर्च्यात विदर्भ, मराठवाडा व खान्देश मधील पदाधिकारी, भूमीहीन, अतिक्रमणधारक बहुसंख्येने सहभागी झाले. यावेळी शासनाच्या वतीने मंत्री गिरीश महाजन यांनी निवेदन स्वीकारले. संघटनेच्या मागण्यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत बैठक लावण्याचे आश्वासन ना महाजन यांनी दिले.

वन व महसुल भुमिहक्क व भूमीहिनांची पूर्ण कर्जमुक्ति, दलित, अदिवासी भुमिहीनांना वन व महसुल जमीन कायम पट्टे व निवासी घराचे पट्टे, भुमिहीनांची कर्जमुक्ती, स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मीती, आत्महत्या ग्रस्त व अन्याय ग्रस्त शेतकरी शेतमंजुराना आर्थिक मदत, जिगांव प्रकल्प बांधित शेकडो कुंटुंबाना अतिक्रमीत जमीन व निवासी अतिक्रण घराचा एक रक्कमी १० लक्ष रुपये मोबदला, रमाई व अन्य घरकुल योजना लाभ अडीच लक्ष करण्यात यावा आदी मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. यामध्ये भिमराव खरात, दिनकर घेवंदे, बाबुराव सरदार भगवान गवई ,अंबादास वानखेडे, रमेश गाडेकर, अशोक इंगळे, प्रकाश वानखेडे मधूकर मिसाळ, मुन्ना पराते, दिलीप रामटेकर, प्रमोद पोहेकर,प्यारसिंग पावरा, जुलमाबाई पवार , भरत मुंडे ईलियास पठाण, गजानन जाधव आदी सहभागी झाले.

# अमडापूर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व अवैद्य धंदे तात्काळ बंद करा, रि.पा.ई. ची मागणी....!

**जनसंचलन /चिखली**




दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने युवा कार्याध्यक्ष आम्रपाल भाऊ वाघमारे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने पोलीस स्टेशन अमडापूर ठाणेदार सचिन पाटील साहेब यांना निवेदन देऊन अमडापूर पोलीस स्टेशन हद्दीतील वरली मटका अवैध दारू अवैद्य गौण खनिज वाहतूक अवैद्य गुटखा अवैद्य राशन चे तांदूळ गहू पत्त्यांचे क्लब चक्री इत्यादी सर्व अवैध धंदे निवेदन दिल्यापासून सात दिवसाच्या आत तात्काळ बंद करण्यात यावे अन्यथा हे अवैध धंदे बंद न झाल्यास रिपाई च्या वतीने पोलीस स्टेशन अमडापूर च्या समोर अवैध दारू चक्री मटका वरली जुगार गुटखा इत्यादी अवैध धंदे सुरू करण्याची परवानगी द्या. अन्यथा सर्व धंदे तात्काळ बंद करा असे न झाल्यास दिलेले निवेदनच परवानगी समजून पोलीस स्टेशनसमोर अवैध धंदे चालू करण्यात येईल .असे निवेदनात नमूद आहे . यावेळी उपस्थित आम्रपाल वाघमारे युवक जिल्हा कार्याध्यक्ष,दीपक जाधव रिपाइं कार्यकर्ते,सागर जाधव रिपाइं कार्यकर्ते, मयूर मोरे युवक तालुका उपाध्यक्ष,राजेश बोर्डे चिखली शहर अध्यक्ष, आकाश जाधव युवक तालुका सहसचिव, नितीन कांबळे चिखली शहर कार्याध्यक्ष,राहुल साळवे, पुंजाजी साळवे, रतन वानखेडे,सुदर्शन निकाळजे,पंकज वानखेडे, सैय्यद आयाज,ग्रा. प.सदस्य,सागर वानखेडे, अनु भाई,भूषण निकाळजे, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते....

---

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे बुलढाणा पंचायत समिती समोर काम बंद आंदोलन...

जनसंचलन/बुलढाणा

ग्रामपंचायत कर्मचारी तीन दिवसापासून पंचायत समिती बुलढाणा येथे काम बंद आंदोलन करीत आहे. गेल्या कित्येक दिवसापासून त्यांच्या मागण्या या प्रलंबित असल्यामुळे त्यांनी तीन दिवसीय आंदोलन पंचायत समिती बुलढाणा येथे सुरू केले होते त्यांच्या मागण्या या आतापर्यंत ही मंजूर झालेल्या नाहीत. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगर पालिका व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे. निवृत्ती वेतन लागू करणे.भविष्य निर्वाह निधीची रक्कम कामगार भविष्य निधी संघटन (इपीएम) या कार्यालयात जमा करणे. कर्मचाऱ्यांना सुधारित किमत वेतन लागू करणे व वेतनासाठी लादलेली वसुलीची अट रद्द करणे.




कर्मचा-यांच्या आकृतीबंधामध्ये सुधारणा करणे.जिल्हा परिषद सेवेत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून एकूण रिक्त पदाच्या १०% प्रमाणे वर्ग ३ व ४ च्या पदावर नियुक्ती देणे. व या मागण्या जर येत्या आठ दिवसांमध्ये जर मंजूर झाल्या नाहीस तर येत्या काळात मध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू अशी माहिती पंढरीनाथ आत्माराम भोसले महाराष्ट्र कामगार सेना तालुका उपाध्यक्ष यांनी दिली यावेळी रवींद्र पंडितकर अध्यक्ष, भासले सचिव, सदाभाऊ आडवे, राकेश जाधव, राजू सावळे, शितल उखळकर, शाम चव्हाण व समस्त ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थितीत होते.

# वीज वितरण कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात आ. संजय गायकवाड झाले सभागृहात आक्रमक

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा इतरांना उजेड देणारा लाईनमन हा मात्र विविध समस्यांच्या अंधारात असून, लाईनमन स्टाफ बचाव कृती समितीने केलेल्या आंदोलनाची दखल घेवून त्यांच्या मागण्या तात्काळ सोडविण्यासंदर्भात आ. संजय गायकवाड यांनी विधीमंडळ पटलावर आक्रमक होवून आवाज उठविला. मंगळवार १९ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्याच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आ. संजय गायकवाड यांनी सभागृहात लक्षवेधी दरम्यान बोलताना महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ ते महावितरण कंपनीपर्यंतचा कार्यकाळ पाहता तळागाळामध्ये कार्यरत असणारे लाईनस्टाफ कर्मचारी यांच्या ज्वलंत प्रश्नासंदर्भात शासन स्तरावर अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मानव संसाधन स्तरावर अनेक बैठका झाल्या आहेत. त्यांच्या न्यायहक्क मागण्यासंदर्भात कोणताही ठोस निर्णय न झाल्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे लाईनस्टाफ बचाव कृती समिती यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान आंदोलनाच्या इशारा दिला होता आणि त्यांचे आंदोलन सुरू आहे, या कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये आतापर्यंत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा याकरिता शासनाने संबंधित मंत्री महोदयांना बचाव कृती समितीच्या मागण्या मान्य कराव्या ही महत्वपूर्ण मागणी यावेळी केली तसेच हा मुद्दा तातडीने सोडून शासनाने त्यांना न्याय द्यावा, जेणेकरून शेतकऱ्यांची जी वीज खंडित होत आहे ती गैरसोय थांबेल.. असेही आ. गायकवाड म्हणाले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

जनसंचलन/चिखली

मेरा बु. एका ५५ वर्षीय पादचऱ्याचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. ही घटना १९ डिसेंबर रोजी सकाळी मेरा खुर्द फाट्यावर घडली. अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गुंजाळा येथे पत्नी कडे गेल्या २ ते ३ वर्षांपासून राहण्यास आलेले जालना येथील ५५ वर्षीय अर्जुन सखाराम वानखेडे हे ४ दिवसापासून गावातून बाहेर गेले होते. नातेवाईकांनी त्यांचा शोध घेतला असता कुठेही आठळून आले नव्हते. मात्र १९ डिसेंबर रोजी सकाळी मोबाईल व्हॉट्सअपवर अज्ञात वाहनाच्या धडकेत अनोळखी व्यक्तीचा मेरा खुर्द फाट्यावर मृत्यु झाला अशी बातमी




अंढेरा पोलीस स्टेशनचे पोहेकाँ कैलास उगले यांनी व्हायरल केली. ही बातमी पाहून गुंजाळा येथील त्यांच्या पत्नी व नातेवाईकांनी ओळख पटवून मृतदेह ताब्यात घेतला आणि जालना येथील मृतकाचे भाऊ व नातेवाईकांनी त्यांचा अंत्यस्कार विधी करण्यासाठी जालना येथे घेवून गेले. अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार कैलास उगले यांनी पंचासमक्ष पंचनामा करून मर्ग दाखल केला आहे.

# नागरिकांनो, मतदारयादीत नावनोंदणी करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## निवडणूक जनजागृती प्रचाररथाला हिरवी झेंडी...

जनसंचलन / बुलढाणा

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ची प्रशासकीय स्तरावर पूर्वतयारी सुरु असून, मतदारांमध्ये ईव्हीएमबाबत जनजागृती करण्यात येत आहे. या निवडणुकीत मतदान करण्यासाठी नागरिकांनी मतदारयादीत नावनोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज येथे केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी प्रचाररथाच्या माध्यमातून विशेष मतदार नोंदणी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या निवडणूक जनजागृती प्रचाररथाला जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पाटील बोलत होते. अपर जिल्हाधिकारी सुनील विंचनकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी शरद पाटील, सदाशिव शेलार, नायब तहसीलदार संजय बंगाळे आदी यावेळी उपस्थित होते. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटबाबत असलेल्या शंकाचे निरसन करण्यासाठी जिल्ह्यात प्रचाररथ फिरून नागरिकांमध्ये विशेष जनजागृती करणार आहे. मतदारांनी त्यांच्या शंकाचे निरसन करून घेताना,



मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे जावून आपले नाव मतदारयादी असल्याची खात्री करून घ्यावी. नसल्यास संबंधितांकडून अर्ज घेऊन भरून द्यावा, तसेच व्हॉल्टर ॲपफ्नर जावूनही नावनोंदणी करावी, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले. या विशेष जनजागृती मोहिमेमध्ये इव्हीएम मशीन कशा प्रकार कार्य करते, त्यात असलेली पारदर्शकतेची माहिती देण्यात येत आहे. मतदानाच्या दिवशी मतदारांनी मशीनचा योग्य पद्धतीने वापर करून आपला मताधिकार पार पाडावा. त्यासाठी मतदारांनी नावनोंदणी करणे आवश्यक असून, नागरिकांनी या जनजागृती रथाच्या माध्यमातून माहिती करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. मतदारयादीमध्ये नाव नोंदविण्यासाठी निवडणूक विभागाच्या संकेतस्थळावर जावूनही थेट ऑनलाईन नाव नोंदवता येणार आहे. शाळेतील केंद्रस्तरीय मतदान अधिकारी किंवा तहसील कार्यालयात जावूनही नाव नोंदविता येईल. तसेच कुटुंबातील मतदार असलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला असल्यास त्याचे मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी अर्ज करावा. तसेच एका गावातून दुसऱ्या गावात कामानिमित्त स्थलांतरीत झाल्यास नवीन गावात नाव नोंदविता येणार आहे. ते आवश्यक असून, पूर्वी राहत असलेल्या गावातील मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# आयुषमान भारत समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा मातृतीर्थ सिंदखेडराजात सत्कार

जनसंचलन/सिंदखेडराजा

महाराष्ट्र शासनाच्या आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती चे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे गोंदिया येथील शासकीय दौरा आटोपून परत जात असताना आज त्यांनी मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे धावती भेट दिली. यावेळी त्यांचे सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर काळुसे, भाजपाचे देवानंद सानप,पत्रकार भगवान नागरे, सोपान केदार, प्रताप सानप दिपक घुगे,यांनी सत्कार व स्वागत केले.



डॉ शेटे यांचे समवेत त्यांचे सहकारी भाजप भटके विमुक्त आघाडीचे मराठवाडा संयोजक बंडुजी खांडेकर, श्रीहरी पारेकर आदी उपस्थित होते.

# आंदोलकांनी सरकारवर विश्वास ठेवावा; मराठा आरक्षणप्रश्नी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं आवाहन...

वृत्तसंस्था/मुंबई

राज्य सरकार मराठा आरक्षण देण्यासाठी सकारात्मक आहे. त्यामुळे आंदोलकांनी सरकारच्या कामावर विश्वास ठेवावा. राज्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे,असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी केले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर विधानसभा आणि विधान परिषदेत उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी हे आवाहन केले.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील सामाजिक वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न होत आहे. कुठल्याही दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होणे हे राज्याला भूषणावह नाही. पुरोगामी महाराष्ट्राला हे तर आजिबातच शोभणारे नाही. महाराष्ट्रामध्ये कुठेही तणाव वाढणार नाही याची काळजी राज्यकर्त्यांनी, विरोधी पक्षांनी आणि एकूणच समाजानेही आजवर घेतली आहे,फ्असेही ते म्हणाले. ओबीसी किंवा अन्य कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे आरक्षण मिळायला पाहिजे, हीच आमची भावना आहे. अन्य मागास समाजाप्रमाणे मराठा समाजालाही आरक्षणाच्या माध्यमातून आपली प्रगती करायची आहे. या मागणीसाठी काहींनी भावनेच्या भरात आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. हे सर्व विषण्ण करणारे, वेदनादायी आणि आपल्याला परवडणार नाही. राज्यातल्या इतर सर्व समाजाशी मिळून मिसळून मराठा समाजाने आजवर महाराष्ट्राची सांस्कृतिक, सामाजिक बांधणी घट्ट केली आहे. महाराष्ट्राच्या विकासाला मोठा हातभार लावला, असेही शिंदे यांनी सांगितले.गेल्या दोन-अडीच महिन्यांत सरकारने एकतर्फी निर्णय घेतलेले नाहीत. तर सर्व पक्ष आणि संघटना यांनासुद्धा मराठा समाजासाठीचे निर्णय घेताना विश्वासात घेतले. मराठा आरक्षणासाठी विविध बैठका घेताना सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकावे यासाठी कायदेतज्ज्ञांची फौज उभी करण्यात आली आहे. शिवाय न्यायालयीन लढाईत सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी निवृत्त न्या. दिलीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कृती गट स्थापन करण्यात आल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. मराठवाड्यातील मराठा-कुणबी, कुणबी-मराठाजात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित केली. तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली. निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजामकालीन करार, त्यावेळच्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज या पुराव्यांची तपासणी कशी करायची हे या समितीने ठरविले. न्या. शिंदे समितीस सादर करण्यात आलेले १२ विभागांचे पुरावे, ४८ दस्ताऐवज ग्राह्य धरण्यासाठी तशी सुधारणा सामाजिक न्याय विभागाच्या नियमात करण्यात येत आहे. त्यामुळे कुणबी लिहिले आणि प्रमाणपत्र दिले इतके ते सोपे नाही. कुणबी प्रमाणपत्र कुणाला दिले याची माहिती वेबसाइटवर दिली आहे. त्यामुळे चुकीने प्रमाणपत्र दिले असेल, तर नागरिकांना तक्रार करता येणार आहे. त्यामुळे कुणीही भीती बाळगू नका. सर्व कायदेशीर प्रक्रियेनुसार कागदपत्रांची तपासणी करून कुणबी प्रमाणपत्रे दिली जात आहेत. हे दाखले अतिशय काटेकोरपणे दिले जात आहेत. न्या. शिंदे समितीचा पहिला अहवाल ३१ ऑक्टोबरला राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला. दुसरा अहवाल समितीने काल आम्हाला सादर केला आहे. ४०७ पानांचा हा अहवाल आहे. हा अहवाल विधी आणि न्याय विभागाला छाननी आणि विश्लेषणासाठी पाठवत आहोत. त्यांच्या शिफारशी आल्यानंतर अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवला जाईल, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.विधान परिषदेत उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी,रक्तातील



नात्यांना आरक्षणाचा फायदा कसा द्यायचा याबाबत राज्य सरकारने २०१७ मध्येच कायदा करण्यात आला असून त्यानुसार फायदा देण्यात येईल तसेच तशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील असे सांगितले.विरोधी पक्षाने एकनाथ शिंदे यांच्या उत्तरावर टीका केली आहे. मुख्यमंत्री आज जे उत्तर दिले ते मराठा समाजाची फसवणूक करणारे होते. ओबीसी आणि मराठा समाजाचे प्रश्न आम्ही मांडले होते. त्याला ठोस उत्तर दिलेले नाही. विशेष करून आरक्षणासाठी तारखेची कोणतीही मर्यादा नाही. त्यामुळे आजचे उत्तर म्हणजे खोडा पहाड निकला चुहा अशा स्वरूपाचे असल्याची टीका विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

# ठाकरेंच्या प्रामाणिक शिलेदारांनीच साथ सोडली, नवी मुंबईत राजकीय भूकंप...

वृत्तसंस्था/मुंबई

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटातील माजी नगरसेवकांसह १०० पदाधिकाऱ्यांनी सोमवारी शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला. यामुळे नवी मुंबईतील उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. यामध्ये माजी नगरसेवकांसह विद्यमान शहरप्रमुख व उपजिल्हाप्रमुखांचा समावेश आहे. आतापर्यंत शिवसेनेचे प्रामाणिक शिलेदार म्हणून हे सर्व ओळखले जात होते. त्यांनीही अखेर शिंदे गटात प्रवेश केल्याने नवी मुंबईत मोठा राजकीय भूकंप झाल्याचे बोलले जाते.

शिवसेनेत दोन गट पडल्यावर शिवसैनिकांनी आपापली बाजू शोधली होती. नवी मुंबईतील निम्मे शिवसैनिक उद्धव ठाकरे गटात, तर निम्मे शिंदे गटात गेले होते. मात्र आता ठाकरे गटातील माजी नगरसेवक आणि विद्यमान पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी शिंदे गटाची वाट धरली. सानपाडा येथे संध्याकाळी झालेल्या कार्यक्रमात या शिवसैनिकांनी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.यात माजी नगरसेवक मनोहर जोशी, माजी नगरसेवक आणि विद्यमान शहरप्रमुख विजय माने, उप जिल्हाप्रमुख दिलीप घोडेकर, मिलिंद सूर्यराव, विभागप्रमुख संतोष पाटील आदींसह सुमारे १०० पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. यावेळी आयोजित मेळाव्याला शिवसेना ठाणे संपर्क प्रमुख नरेश मस्के, जिल्हाप्रमुख विजय चौगुले, शिवसेना उपनेते विजय नाहाटा, यांच्यासह माजी नगरसेवक, नगरसेविका आणि शिंदे गटातील



नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.नेरूळ विभागातील हे माजी नगरसेवक कार्यक्षम म्हणून ओळखले जात असल्याने त्यांचा प्रभागात वेगळा दबदबा आहे. याचा फटका सेनेला बसण्याची शक्यता आहे. सानपाडा विभागातील नगरसेवकही शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे.

# निमगांव वायाळ रेतीघाटामधील भ्रष्ट्राचार तात्काळ थांबवा...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

मौजे निमगांव वायाळ येथे शासनाच्या आदेशास अनुसरून जो रेतीघाट सुरू करण्यात आला आहे त्या रेती घाटामध्ये शासनाचे सर्व नियम, अटी व शर्ती मायदळी तुडवून केवळ ठेकेदाराचे हितसाध्य करण्यासाठी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यासोबत संगणमत करून शासनाचे लाखोरूपयाचे महसूल बुडविण्याचे मोठे नुकसान करीत आहे. ठेकेदार अंदाधुंद उपसत असलेल्या रेतीला पायबंद न घातल्यास आम्हा गांवकऱ्यांना पाण्यासाठी भटकंतीची वेळ चालून येणार आहे त्यास सर्वस्वी महसुल विभाग जबाबदार राहील तसेच रेतीघाटावर वाद होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास मा. तहसिलदार जबाबदार समजून आपणाविरोधी



जनआंदोलन पुकारण्यात येईल. निमगांव वायाळ येथील सुरू असलेला रेती घाटावर केवळ लेबरचाच रेतीभरण्यासाठी वापर करण्यात यावा, पाकलॅन्डचा वापर करण्यात येऊ नये तसेच प्रत्येक क्षणाला. कायमस्वरूपी सुरू ठेवून त्याचा अहवाल तक्रारदारांना देण्यात यावा. सबंधीत तक्रारीचे निवारण न झाल्यास आम्ही तक्रारदार दि. २२/१२/२०२३ पासून तहसिलदार कार्यालय सिंदखेडराजा येथे अमरणउपोषण करु असे देवानंद मुरलीधर सपकाळ यांनी अर्जाद्वारे कळविले .

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | 8 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | 12 cm | 12 cm |
| 1800/- | 8 cm | 10 cm |
| 1300/- | 8 cm | 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com